Registered - R.N.I. No.: MAHMAR/2008/26837 • Postal Regd. No.: MCN/110/2018-2020 • Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, GPO, Mumbai on 12th & 13th of every month.

फेब्रुवारी २०१९

किंमत रु. २/-

खंड १२, अंक २

वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड यांचे मासिक

# वेल्थवाईज®

**Wiseinvest®**
With YOU, in meeting
FINANCIAL CHALLENGES

## आतील बाजूस | पान क्र.


| आतील बाजूस | पान क्र. |
|---|---|
| केंद्र सरकारचा अंतरिम अर्थसंकल्प | २ |
| निवडक फंडचा परिणाम | ३ |
| वेळ आली आहे, वित्तीय नियोजनाची कास धरण्याची | ४ |


## "वाईजइन्व्हेस्ट"

"वेल्थवाईज" हे वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स चे मासिक प्रकाशन आहे. वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स म्युच्युअल फंडस् चा विशेष व्यासंग असलेली उत्तम सल्लागार कंपनी आहे. जरी म्युच्युअल फंडस् हा पैसा गुंतवण्याचा सोपा मार्ग असला तरी व्यावसायिक सल्ला मिळाला तरच तुम्हाला सर्वोत्तम प्राप्ती होईल. आमचे सीईओ श्री. हेमंत रूस्तगी हे सुप्रसिध्द पर्सनल फायनान्स तज्ञ आहेत. त्यांच्याकडे म्युच्युअल फंड उद्योग क्षेत्रातला २५ वर्षांपेक्षा अधिक अनुभव आहे. ते नियमितपणे मुख्य राष्ट्रीय दैनिकांतून आणि व्यापारविषयक मासिकांतून लेख लिहितात त्याचप्रमाणे गुंतवणुकीशी संबंधित दूरदर्शनवरच्या अनेक कार्यक्रमांतून पर्सनल फायनान्स तज्ञ म्हणून उपस्थित असतात. त्या खेरीज, म्युच्युअल फंड उद्योगात अनेक वर्षे व्यतीत केलेल्या व्यावसायिकांचा समावेश आमच्या सल्लागारांच्या फळीत आहे. गेल्या तेरा वर्षांत आमच्या हजारो ग्राहकांना आमच्या उत्तम सल्ल्याचा लाभ झालेला आहे आणि त्यांनी त्यांच्या पोर्टफोलिओचा म्युच्युअल फंडस् हा मुख्य आधार बनवलेला आहे. तुमच्या सध्याच्या तसेच नवीन गुंतवणुकीसाठी तुम्हाला सुध्दा आमच्या तज्ञ मार्गदर्शनाचा लाभ होऊ शकतो. तुम्हाला फक्त आमच्या कोणत्याही शाखेला फोन करणे अथवा information@wiseinvestadvisors.com या संकेतस्थळावर तुमचे तपशील ई–मेल करणे एवढेच करायचे आहे आणि आमचे व्यावसायिक सल्लागार उरलेले सर्व काही करतील.

प्रिय गुंतवणूकदार,



हंगामी अर्थमंत्री २०१९ चा हंगामी केंद्रीय अर्थसंकल्प सादर करण्यासाठी उभे राहण्यापूर्वीच एक गोष्ट स्पष्ट होती की एप्रिल-मे मध्ये येऊ घातलेल्या राष्ट्रीय निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून मतदारांना गोंजारण्यावर त्याचा भर असणार. आणि खरोखरंच तो एक राजकीय अर्थसंकल्प होता. शेतकऱ्यांसाठी, असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी आणि मध्यम वर्गासाठी करायचे राहून गेले होते ते भरून काढण्याच्या प्रयत्नात काही मोठ्या घोषणा करण्यात आल्या.

प्रधानमंत्री सन्मान निधी योजनेच्या अंतर्गत ज्यांच्या मालकीची जमीन २ हेक्टर (५ एकर) पर्यंत आहे अशा १२ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये प्रतिवर्षी रु.६००० थेट जमा करण्याची घोषणा वित्तमंत्र्यांनी केली. वयाच्या ६०व्या वर्षानंतर असंघटित कामगारांना दरमहा रु.३००० चे आश्वासित पेन्शन देणाऱ्या प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन (पीएमएसवायएम) योजनेचा शुभारंभ करण्यात आला. ह्या योजनेनुसार कामगार आणि सरकार दोघेही दरमहा प्रत्येकी रु.१०० चे योगदान देतील. असंघटित क्षेत्रातील १० कोटी कामगारांना ह्याचा लाभ होईल आणि ही योजना पाच वर्षांमध्ये असंघटित क्षेत्रासाठी राबविली जाणारी सर्वात मोठी पेन्शन योजना ठरण्याची शक्यता आहे.

रु.५ लाखांपर्यंत करपात्र उत्पन्न असणाऱ्या मध्यमवर्गी करदात्यांना आता पूर्ण कर वटाव (रीबेट) मिळेल. म्हणजेच ज्यांचे एकंदर उत्पन्न रु.६.५ लाखांपर्यंत असेल अशा व्यक्तींनी जर कलम ८०सी अंतर्गत रु.१.५ लाख वजावटीचाही पूर्ण फायदा घेतला तर त्यांना काहीही कर भरावा लागणार नाही. ह्याच्या परिणामी ३ कोटी मध्यमवर्गी करदात्यांना, स्वयंनियोक्त तसेच ज्येष्ठ नागरिकांना एकूण रु.१८,५०० कोटी रुपयांचा लाभ होईल. निवडणुकांपूर्वीचा लोकानुनय हा या अर्थसंकल्पाचा केंद्रबिंदू असला तरी ह्या उपाययोजनांमुळे २५ कोटींहून जास्त लोकांना लाभ होणार असल्याने संरचनात्मक खपाला त्यामुळे चालना मिळून ऑटोमोबाईल, एफएमसीजी, गृहनिर्माण आणि घरबांधणी साहित्य ह्यांच्या मागणीत वाढ होईल.

ह्या अर्थसंकल्पाला शेअर बाजारानेही सकारात्मक प्रतिसाद दिला कारण सरकार वित्तीय दूरदर्शीपणापासून फारसे ढळलेले नाही. चालू आर्थिक वर्षासाठी आणि २०१९-२० साठी वित्तीय तूट ३.४ टक्के ठरविण्यात आली. तथापि अर्थव्यवस्थेच्या वाढीचा सध्याचा आलेख विचारात घेता प्रत्यक्ष करांमध्ये १५% वाढ आणि अप्रत्यक्ष करांमध्ये १३% वाढ गृहीत धरणे काहीसे महत्त्वाकांक्षी वाटते. सेन्सेक्स आणि निफ्टी हे बेंचमार्क निर्देशांक २०१९ च्या अर्थसंकल्पानंतर उंचावल्याने बाजाराच्या मन:स्थितीला चांगलीच उभारी आली. सेन्सेक्स २१२ बिंदू वर म्हणजे ३६,४६९.४३ वर बंद झाला तर निफ्टी १०,९०० चा टप्पा गाठण्याच्या अगदी जवळ पोहोचला.

आता केंद्रीय अर्थसंकल्पाचे सोपस्कार पार पडल्याने लक्ष येत्या सार्वत्रिक निवडणुकांकडे लागेल. जर तुम्ही ३-५ वर्षे किंवा अधिक कालक्षितिजाच्या विचाराने दीर्घ मुदतीची गुंतवणूक करीत असाल तर राष्ट्रीय निवडणुकांच्या निकालांची काळजी न करता तुमची गुंतवणूक प्रक्रिया अखंडितपणे सुरू ठेवणे दूरदर्शीपणाचे ठरेल. ध्यानात असू द्या, निवडणुकीसारख्या घटनेचा शेअर बाजारावरील परिणाम अल्पकालीन असतो. दीर्घ मुदतीत बाजार पायाभूत घटक आणि उत्पन्न ह्यांचाच माग घेतो आणि राजकीय सत्ता कोणतीही असली तरी निकोप उत्पन्न देतो.

सस्नेह,

हेमंत रुस्तगी
संपादक

Address to be affixed here

## जानेवारी २०१९ मधील शेअर बाजारातील परिणाम

| निर्देशांक | ०१ जानेवारी २०१९ | ३१ जानेवारी २०१९ | बदल (%) |
|---|---|---|---|
| सेन्सेक्स | ३६,२५४.५७ | ३६,२५६.६९ | ०.०१ |
| मिडकॅप | १५,४२६.३८ | १४,५६०.०९ | -५.६२ |
| स्मॉल कॅप | १४,७६६.८६ | १३,९२६.२२ | -५.६९ |
| बी एस ई-१०० | ११,२००.६१ | ११,०५४.८२ | -१.३० |
| बी एस ई-२०० | ४,६६८.६१ | ४,५८७.५८ | -१.७४ |
| बी एस ई-५०० | १४,५८७.२५ | १४,२८५.११ | -२.०७ |





INVEST WITH THE EXPERTS
INVEST WITH **KOTAK SIP**

kotak Mutual Fund

SIP is a Systematic Investment Plan (SIP) that allows you to periodically invest a fixed amount over a defined period of time. With SIP, you benefit from Rupee Cost Averaging, which means you buy more units when the markets are down and lesser units when markets are high. This helps you to ride through the market volatility smoothly. Thus, making your investment more efficient. So, invest with Kotak SIP today and reap the benefits of investing with the experts.

Call: 1800222626 | www.kotakamc.com

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

Connect with us on

# केंद्र सरकारचा अंतरिम अर्थसंकल्प

## ठळक वैशिट्ये

### आयकरातील सवलती

- वैयक्तिक करदात्यांसाठी ५ लाख रुपयांपर्यंतच्या करपात्र उत्पन्नावर कर नाही. कलम ८०C,८०CCD1B,८०D मध्ये गुंतवणूक केली तर त्यांना १२५००/- रुपयांचे करसूट मिळणार.
- पगारदपर वर्गासाठी मानक वजावट ४०,००० रुपयांवरून ५०,००० रुपयांपर्यंत वाढवली.
- घरभाड्यासाठी टीडीएसची मर्यादा १.८ लाख रुपयांवरून २.४ लाख रुपयांपर्यंत वाढवली.
- पोस्ट ऑफिसेस आणि बँकांमधून मिळणारे ४०,००० रुपयांपर्यंतचे व्याज टीडीएसमुक्त केले.
- कलम ५४ अंतर्गत भांडवली नफ्यावरील कर सूट २ घरांसाठी उपलब्ध होणार.(कमाल मर्यादा२ कोटी रुपयांपर्यंत).
- विक्री न झालेल्या घरांपासून मिळणाऱ्या काल्पनिक भाड्यावरील (नोशनल रेंट) आयकर सूट १ वर्षाऐवजी २ वर्षांपर्यंत वाढवली.

### कराशी संबंधित इतर दिलासे

- आयकर विवरणांवर २४ तासांच्या आत प्रक्रिया केली जाणार आणि परतावा तात्काळ दिला जाईल.
- जवळपास दोन वर्षांच्या आत, आयकर विवरणांचे बहुतेक सर्व करनिर्धारण आणि पडताळणी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय निनावी करप्रणालीद्वारे केली जाणार.

### शेतकऱ्यांसाठी

- २ हेक्टरपर्यंत जमीन असलेल्या शेतकऱ्यांना दरवर्षी ६,००० रुपये तीन समान हप्त्यांमध्ये मिळणार. ही योजना १ डिसेंबर २०१८ पासून लागू होईल.
- पशुपालनासाठी कामधेनू योजना.
- शेतीसाठी कर्ज घेणाऱ्यांसाठी व्याजावर सूट: नैसर्गिक संकटांमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना व्याजात २% सूट मिळणार आणि वेळेवर परतफेड केल्यास अतिरिक्त ३% सूट मिळणार.
- जे शेतकरी पशुपालनाच्या, मत्स्यपालनाच्या व्यवसायात असतील, त्यांना किसान क्रेडिट कार्डांच्या माध्यमातून व्याजात २% सूट.

### ग्रामीण भागासाठी निधी

- मनरेगासाठी ६०,००० कोटी रुपये.
- ग्राम सडक योजनेंतर्गत ग्रामीण भागात रस्तेबांधणीसाठी १९,००० कोटी रुपयांचा निधी.

### सामाजिक योजना

- सरकार १ लाख डिजिटल खेडी बांधणार.
- शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आणि त्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी, सर्व २२ पिकांसाठी किमान हमी किंमत उत्पादन खर्चाच्या १.५ पटींनी वाढविण्यासाठी ऐतिहासिक निर्णय घेतला गेला.
- अधिक स्वच्छ इंधन आणि आरोग्यविम्याची खातरजमा करण्यासाठी आम्ही प्रधानमंत्री उज्ज्वला योजना हा ग्रामीण घरकुलांसाठी मोफत एलपीजीची जोडणी देण्यासाठी ८ कोटी रुपये देण्याचा कार्यक्रम राबविला, यापैकी ६ कोटी जोडण्या याआधीच दिलेल्या आहेत.
- अधिसूचित न केलेल्या भटक्या आणि अर्ध-भटक्या जमातींसाठी नीती आयोगाच्या अखत्यारीत समिती स्थापन करणार.
- चित्रपटनिर्मात्यांना सर्व प्रकारच्या परवानग्या देण्यासाठी सिंगल विंडोच्या माध्यमातून, पायरसी रोखण्यासाठी सिनेमॅटोग्राफी अॅक्टमध्ये अँटि-कॉमकॉर्डिंगच्या तरतुदी लागू करणार.

### वस्तू आणि सेवा कर (जीएसटी)

- घर खरेदी करणाऱ्यांसाठी जीएसटी कमी करण्यासाठी मंत्रीगट सूचना करणार.
- २०१३-१४मध्ये गोळा केलेल्या ६.३८ लाख कोटींच्या थेट कराच्या तुलनेत सुमारे १२ लाख कोटी गोळा केले; टॅक्स बेस ३.७९ कोटी रुपयांपासून ६.८५ कोटी रुपयांपर्यंत वाढवला.
- ५ कोटी रुपयांपेक्षा कमी वार्षिक उलाढाल असलेल्या व्यवसायांना, ज्यात ९०%पेक्षाही अधिक जीएसटी भरणारे आहेत, त्यांना प्रत्येक तिमाहीला विवरण सादर करण्याची परवानगी दिली जाईल.
- भारतीय उत्पादन शुल्क विभाग आयात-निर्यातीचे सर्व व्यवहार संपूर्णपणे डिजिटाईझ करणार आणि लॉजिस्टिसाठी आरएफआयडीचे पाठबळ पुरवील. सरकारने ३६ भांडवली वस्तूंवरील उत्पादन शुल्क रद्द केले.
- जानेवारी २०१९मध्ये गोळा झालेली वस्तू आणि सेवा कराची रक्कम १ लाख कोटींहूनही अधिक.

### कामगारांसाठी घोषणा

- असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी दरमहा १५,००० रुपये उत्पन्नासह नवीन प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना. लाभार्थींना दरमहा १०० रुपयांची वर्गणी भरून निवृत्तीनंतर दरमहा ३,००० रुपये निवृत्तीवेतन मिळणार. सरकारने या योजनेसाठी ५०० कोटी रुपयांचा निधी दिला.
- कामगारांसाठी उपदानाची (ग्रॅच्युईटी) मर्यादा वाढवली.

### संरक्षण खाते

- सरकारने संरक्षण खात्याच्या अर्थसंकल्पात ३ लाख कोटी रुपयांपेक्षाही अधिक वाढ केली. आवश्यकता भासल्यास सरकार संरक्षण खात्यासाठी अतिरिक्त निधी देणार.
- गेल्या काही वर्षांमध्ये ओआरओपी योजनेंतर्गत ३५,००० कोटी रुपयांचे वाटप केले.

### रेल्वेज

- रेल्वेचे परिचालन गुणोत्तर आ.व. २० मधील ९५% च्या तुलनेत आ.व. १९ मध्ये ९६.२% दिसून आले.
- रेल्वेसाठी आर्थिक वर्ष २०२०साठीचा भांडवली खर्च विक्रमी १.६ लाख कोटी एवढा निश्चित करण्यात आला.
- आज भारतात ब्रॉड गेजमध्ये कर्मचारी तैनात नाहीत असे एकही रेल्वे क्रॉसिंग नाही.

### आर्थिक स्थिती

- आ.व. २०१९साठी सरकारने आर्थिक तुटीचे लक्ष्य ३.४ टक्के असे सुधारित केलेले आहे.
- सरकारने याआधी आर्थिक तूट मार्च २०२०च्या अखेरीपर्यंत स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या ३.१ टक्क्यांपर्यंत आणि मार्च २०२१पर्यंत ३ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचे आश्वासन दिले होते.

### अर्थव्यवस्थेची स्थिती

- भारत येत्या ५ वर्षांमध्ये ५ दशलक्ष कोटी (ट्रिलिअन) अमेरिक डॉलर्सची आणि येत्या आठ वर्षांमध्ये १० दशलक्ष कोटी अमेरिकन डॉलर्सची अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे.

### काळा पैसा

- काळ्या पैशांचे स्रोत मुळापासून उखडून टाकण्यासाठी कटिबद्ध; काळ्या पैशाच्या विरोधात केलेल्या उपाययोजनांमुळे सुमारे १.३० लाख कोटी रुपयांचे छुपे उत्पन्न उघड झाले; ३.३८ लाख शेल कंपन्यांची नोंदणी रद्द करण्यात आली.
- जीएसटी सातत्याने कमी केला जात आहे, परिणामस्वरूपी ग्राहकांना ८०,००० कोटी रुपयांचा दिलासा मिळाला; गरीब आणि मध्यम वर्गाच्या दैनंदिन वापराच्या बहुतेक वस्तू आता ०%-५% टॅक्स ब्रॅकेटमध्ये आहेत.
- आर्थिक वर्ष २०१९मध्ये आर्थिक तूट ३.४ टक्के भाकीत केली गेली होती आणि सध्याची खात्यातील तूट स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या २.५% आहे.
- आम्ही नादारी आणि दिवाळखोरी संहितेच्या माध्यमातून ३ लाख कोटी रुपये वसूल केलेले आहेत. सेंट्रल बँकेच्या प्रॉम्प्ट करेक्टिव्ह अॅक्शन यादीदील बँकांची नावे लवकरच कमी करण्याची सरकारला अपेक्षा आहे.

# निवडक फंडचा परिणाम

## जानेवारी २५, २०१९ रोजी असलेल्या नोंदी

## इक्विटी फंडस्

| Fund | Launch | 6 Mth* | 1 Year* | 2 Year** | 3 Year** | 5 Year** | 7 Year** | 10 Year** | 15 Year** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ABSL Frontline Equity Fund | Aug-02 | -4.14 | -7.67 | 8.08 | 12.26 | 14.51 | 14.78 | 18.50 | 17.19 |
| ABSL Equity Fund | Aug-98 | -2.91 | -8.29 | 7.34 | 15.49 | 18.43 | 17.15 | 19.16 | 18.05 |
| Axis Bluechip Fund | Jan-10 | -6.32 | 3.93 | 17.21 | 14.47 | 14.61 | 15.00 | — | — |
| Axis Focused 25 Fund | Jun-12 | -13.21 | -5.69 | 14.19 | 15.84 | 16.21 | — | — | — |
| Franklin India Equity Fund | Sep-94 | -3.31 | -8.41 | 8.07 | 11.03 | 16.37 | 15.30 | 18.67 | 17.59 |
| HDFC Equity Fund | Jan-95 | 2.10 | -8.71 | 10.87 | 15.61 | 15.93 | 14.04 | 20.27 | 17.83 |
| HDFC Top 100 Fund | Sep-96 | 2.52 | -5.60 | 10.93 | 15.86 | 14.86 | 13.17 | 18.71 | 17.51 |
| HSBC Large Cap Equity Fund | Dec-02 | -7.24 | -8.92 | 8.34 | 13.14 | 12.18 | 11.01 | 13.26 | 14.02 |
| ICICI Prudential Bluechip Fund | May-08 | -2.30 | -6.02 | 10.80 | 13.73 | 14.52 | 14.03 | 19.51 | — |
| IDFC Core Equity Fund - Regular Plan | Aug-05 | -5.67 | -11.64 | 8.35 | 13.40 | 12.93 | 13.22 | 14.54 | — |
| Kotak Bluechip Fund - Regular Plan | Dec-98 | -5.70 | -7.57 | 8.34 | 10.82 | 13.51 | 12.41 | 15.34 | 15.77 |
| Kotak Standard Multicap Fund Regular | Sep-09 | -4.29 | -4.60 | 10.80 | 15.26 | 18.63 | 17.15 | — | — |
| L&T Equity Fund | May-05 | -7.67 | -11.87 | 7.08 | 10.84 | 14.21 | 12.77 | 17.79 | — |
| Motilal Oswal Multicap 35 Fund | Apr-14 | -9.83 | -10.69 | 8.26 | 14.64 | — | — | — | — |
| Reliance Large Cap Fund | Aug-07 | 0.22 | -5.98 | 13.55 | 14.45 | 17.03 | 15.71 | 18.05 | — |
| Reliance Multi Cap Fund | Mar-05 | 2.91 | -8.68 | 12.70 | 11.06 | 15.19 | 15.30 | 22.18 | — |
| Invesco India Contra Fund | Apr-07 | -6.01 | -8.24 | 13.44 | 15.73 | 20.62 | 17.33 | 20.86 | — |
| SBI Bluechip Fund | Feb-06 | -5.81 | -8.29 | 7.28 | 10.54 | 15.14 | 15.58 | 18.01 | — |
| Principal Emerging Bluechip Fund | Nov-08 | -8.91 | -14.39 | 8.99 | 15.83 | 22.91 | 21.88 | 25.14 | — |

## सांप्रदायिक / विषयगत आणि कर बचत

| Fund | Launch | 6 Mth* | 1 Year* | 2 Year** | 3 Year** | 5 Year** | 7 Year** | 10 Year** | 15 Year** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ICICI Prudential Banking and Financial | Aug-08 | -0.68 | -6.69 | 13.84 | 23.20 | 23.36 | 20.38 | 23.85 | — |
| Reliance Banking Fund | May-03 | -3.30 | -6.65 | 13.75 | 19.39 | 20.14 | 16.01 | 21.89 | 20.13 |
| Reliance Pharma Fund | Jun-04 | 7.10 | 3.01 | 7.10 | 3.38 | 12.42 | 15.63 | 24.13 | — |
| Canara Robeco Consumer Trends | Sep-09 | -3.69 | -1.64 | 14.64 | 16.96 | 19.01 | 16.93 | — | — |
| SBI Consumption Opportunities Fund | Jul-99 | -3.49 | -8.01 | 17.22 | 16.76 | 15.68 | 18.99 | 24.94 | 19.85 |
| Tata India Consumer Fund - Regular | Dec-15 | -8.54 | -7.62 | 21.53 | 20.18 | — | — | — | — |
| Axis Long Term Equity Fund | Dec-09 | -9.47 | -3.94 | 13.16 | 12.22 | 19.07 | 19.21 | — | — |
| HDFC Taxsaver Fund | Mar-96 | -2.84 | -13.86 | 6.17 | 12.75 | 14.30 | 12.76 | 18.54 | 18.09 |
| HSBC Tax Saver Equity Fund | Jan-07 | -7.10 | -15.54 | 6.85 | 11.58 | 14.79 | 14.65 | 17.25 | — |
| IDFC Tax Advantage (ELSS) Fund | Dec-08 | -7.54 | -15.32 | 11.19 | 13.21 | 15.99 | 16.39 | 18.03 | — |
| Mirae Asset Tax Saver Fund - Regular | Dec-15 | -1.00 | -7.02 | 14.91 | 19.79 | — | — | — | — |

## मिडकॅप आणि स्मॉल कॅप

| Fund | Launch | 6 Mth* | 1 Year* | 2 Year** | 3 Year** | 5 Year** | 7 Year** | 10 Year** | 15 Year** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Axis Midcap Fund | Feb-11 | -4.50 | -0.09 | 15.70 | 13.42 | 20.23 | 19.78 | — | — |
| DSP Midcap Fund - Regular Plan | Nov-06 | -6.47 | -12.62 | 6.28 | 13.78 | 20.78 | 18.43 | 23.39 | — |
| HDFC Mid-Cap Opportunities Fund | Jun-07 | -9.13 | -14.87 | 6.21 | 13.34 | 20.52 | 19.34 | 24.48 | — |
| Kotak Emerging Equity Scheme | Mar-07 | -6.18 | -13.82 | 6.68 | 13.86 | 22.91 | 19.59 | 20.99 | — |
| Franklin India Smaller Companies | Jan-06 | -9.89 | -19.06 | 4.38 | 11.17 | 22.06 | 22.36 | 24.95 | — |
| HSBC Small Cap Equity Fund | May-05 | -12.06 | -28.11 | 1.56 | 8.51 | 18.86 | 16.41 | 16.80 | — |
| L&T India Value Fund | Jan-10 | -6.53 | -16.16 | 5.75 | 12.10 | 21.17 | 19.06 | — | — |
| SBI Magnum Global Fund | Sep-94 | -3.92 | -10.49 | 9.73 | 9.73 | 17.11 | 17.49 | 23.55 | 21.04 |

## हायब्रिड – आरबीट्राज

| Funds | Launch | 3 Mth* | 6 Mth* | 1 Year* | 2 year** | 3 Year** | 5 Year** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ICICI Prudential Equity Arbitrage Fund | Dec-06 | 1.47 | 3.13 | 6.21 | 5.97 | 6.19 | 6.85 |
| Invesco India Arbitrage Fund | Apr-07 | 1.29 | 2.92 | 5.95 | 5.92 | 6.01 | 6.71 |
| Kotak Equity Arbitrage Fund Regular | Sep-05 | 1.47 | 3.19 | 6.35 | 6.21 | 6.28 | 6.97 |

## हायब्रिड

| Fund | Launch | 6 Mth* | 1 Year* | 2 Year** | 3 Year** | 5 Year** | 7 Year** | 10 Year** | 15 Year** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ABSL Equity Hybrid '95 Fund | Feb-95 | -4.46 | -7.48 | 5.47 | 10.10 | 14.50 | 13.42 | 16.87 | 15.38 |
| Canara Robeco Equity Hybrid Fund | Feb-93 | -1.87 | -0.66 | 9.64 | 11.81 | 15.34 | 14.12 | 17.42 | 16.09 |
| HDFC Hybrid Equity Fund | Sep-00 | -0.99 | -5.87 | 8.55 | 12.48 | 16.08 | 15.02 | 19.43 | — |
| ICICI Prudential Balanced Advantage | Dec-06 | 0.77 | 0.86 | 8.22 | 10.57 | 12.40 | — | — | — |
| ICICI Prudential Equity & Debt Fund | Nov-99 | 0.37 | -5.77 | 7.32 | 13.00 | 15.29 | 15.46 | 17.44 | 14.77 |
| Invesco India Dynamic Equity Fund | Oct-07 | -5.97 | -5.78 | 7.40 | 10.77 | 11.76 | — | — | — |
| Kotak Equity Hybrid Fund - Regular | Nov-99 | -4.03 | -8.53 | 4.42 | 10.15 | 10.66 | 10.85 | 13.30 | 13.87 |
| L&T Hybrid Equity Fund | Jan-11 | -5.81 | -9.00 | 6.37 | 9.24 | 14.72 | 14.53 | — | — |
| Principal Hybrid Equity Fund | Jan-00 | -1.73 | -5.05 | 12.34 | 15.78 | 15.38 | 15.16 | 15.99 | 12.96 |
| Reliance Equity Hybrid Fund | Jun-05 | -5.55 | -9.16 | 7.52 | 9.99 | 14.61 | 13.95 | 17.90 | — |
| SBI Equity Hybrid Fund | Dec-95 | -0.80 | -3.11 | 9.94 | 10.88 | 15.03 | 15.80 | 16.75 | 16.35 |
| HDFC Equity Savings Fund | Sep-04 | 1.31 | -0.49 | 6.51 | 11.33 | 9.65 | — | — | — |
| IDFC Equity Savings Fund - Regular | Jun-08 | -0.15 | 2.20 | 3.51 | 4.72 | 5.68 | — | — | — |
| Kotak Equity Savings Fund - Regular | Oct-14 | 0.44 | 2.80 | 7.63 | 8.45 | — | — | — | — |
| Reliance Equity Savings Fund | May-15 | -2.21 | -3.36 | 5.94 | 7.46 | — | — | — | — |

* पूर्ण मोबदला - ** वार्षिक मोबदला. योजनेची पूर्वीची कामगिरी तिच्या भविष्यातील कामगिरीची निदर्शक नाही.

## जानेवारी २०१९ मध्ये इक्विटी व इक्विटी ओरियंटेड फंडने घोषित केलेला निवडक फंडचा नफ्याचा हिस्सा

| Scheme name | Date | Dividend declared in ₹ Per unit |
|---|---|---|
| Tata Hybrid Equity Fund (MD) | 03/01/2019 | 0.53 |
| Franklin Build India Fund (D) | 07/01/2019 | 2.00 |
| ICICI Prudential Equity & Debt (MD) | 09/01/2019 | 0.20 |
| DSP Equity Opportunities - Reg (D) | 10/01/2019 | 2.66 |
| Invesco India Midcap (D) | 11/01/2019 | 2.21 |
| Sundaram Large and Mid Cap Fund (D) | 17/01/2019 | 0.44 |
| DHFL Pramerica Hybrid Equity (MD) | 17/01/2019 | 0.17 |
| Invesco India Tax Plan (D) | 18/01/2019 | 1.77 |
| Tata Mid Cap Growth Fund (D) | 18/01/2019 | 2.83 |
| ICICI Pru Bluechip Fund (D) | 21/01/2019 | 1.77 |
| Reliance Consumption Fund - (D) | 21/01/2019 | 1.55 |
| Reliance Vision Fund - RP (D) | 21/01/2019 | 3.32 |
| UTI Hybrid Equity Fund (D) | 22/01/2019 | 0.10 |
| L&T Large and Midcap (D) | 23/01/2019 | 0.21 |
| DSP Top 100 Equity Fund - Regular (D) | 24/01/2019 | 2.10 |
| HSBC Tax Saver Equity Fund (D) | 24/01/2019 | 1.55 |
| L&T Equity Fund (D) | 24/01/2019 | 2.21 |
| Sundaram Mid Cap Fund (D) | 24/01/2019 | 0.18 |
| Sundaram Equity Hybrid Fund (D) | 24/01/2019 | 0.14 |
| Reliance Large Cap Fund - RP (D) | 25/01/2019 | 0.14 |
| Tata Ethical Fund (D) | 25/01/2019 | 4.87 |
| CR Equity Hybrid Fund - RP - (MD) | 25/01/2019 | 0.60 |
| Kotak Equity Hybrid (D) | 25/01/2019 | 0.11 |
| Franklin India Tax Shield (D) | 28/01/2019 | 3.75 |
| DSP Equity & Bond Fund - Regular (D) | 28/01/2019 | 0.21 |
| UTI LTEF (Tax Saving) (D) | 29/01/2019 | 1.33 |

तुमच्या पोर्टफोलियोमध्ये या यादीत असणाऱ्या तुमच्या फंडसाठी तुम्हाला डिव्हिडन्ड (नफ्याचा हिस्सा) मिळाला आहे का ते बघा. जर तुमच्याकडे कोणतीही पोर्टफोलिओ नोंद नसेल तर वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स तुमच्यासाठी ते कोणत्याही मोबदल्याशिवाय करुन देतील. एकदा आमच्याकडे तपशिल आला की आम्ही तुम्हाला दर महिन्याला नोंदी पाठवू. या मोफत सेवेचा लाभ घेण्यासाठी आमच्या मुख्य कार्यालयाशी किंवा इतर कोणत्याही शाखेशी संपर्क साधा.

सिक्युरिटी गुंतवणुकीप्रमाणेच म्युच्युअल फंड, शेअर बाजार आणि इतर धोक्यांवर अवलंबून असते. कॅपिटलमार्केटवर परिणाम करणाऱ्या घटकांवर आणि प्रभावांवर एन ए व्हि (NAV) चे वर किंवा खाली जाणे अवलंबून असते.

Registered - R.N.I. No.: MAHMAR/2008/26837 • Postal Regd. No.: MCN/110/2018-2020 • Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, GPO, Mumbai on 12th & 13th of every month.
Date of publication: 8th of every month.

# वेळ आली आहे, वित्तीय नियोजनाची कास धरण्याची

वित्तीय नियोजन म्हणजे फायनान्शियल प्लॅनिंग, ही तुमचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी पैशाचे माहितीयुक्त व्यवस्थापन करण्याची प्रक्रिया आहे. फायनान्शियल प्लॅनिंग उपलब्ध स्रोत, जबाबदाऱ्या, जोखीम क्षमता आणि जीवनशैली ह्याचा विचार करून वित्तीय उद्दिष्टे आणि वैयक्तिक प्राधान्यक्रम साध्य करण्यास मदत करते. जोखीम-लाभ संतुलन साधण्यासाठी वित्तीय योजनेत आपल्या बचतीचे नियतन विविध मालमत्तावर्गांमध्ये केले जाते.

## तुम्हाला वित्तीय योजनेची गरज आहे का?

सर्व व्यक्तींना आणि कुटुंबांना, त्यांचे उत्पन्न किंवा वय काहीही असले तरी एका वित्तीय नियोजनाची गरज असते. त्यामुळे निवृत्तीसाठी, महाविद्यालयीन शिक्षणासाठी किंवा नव्या घरासाठी आपण पुरेशी बचत करीत आहोत की नाही ह्याची जाणीव त्यांना होते. आपल्याला वित्तीय योजना आपल्या पैशाची बचत करण्यासाठी आवश्यक असलेली शिस्त देते. एखादा अर्हताप्राप्त आणि अनुभवी वित्तीय नियोजक तुम्हाला तुमच्या गुंतवणुकींचे नियोजन करण्यास मदत करू शकतो जेणेकरून तुम्ही तुमच्या गुंतवणुकी विभिन्न मालमत्ता वर्गांमध्ये तसेच गुंतवणूक पर्यायांमध्ये विभाजित करून तुमच्या जोखीम पातळीत सर्वोत्तम उत्पन्न मिळवू शकता.

वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स हे सेबी नोंदणीकृत गुंतवणूक सल्लागार आहेत (नोंदणी क्र. INA000000664). आमच्या सल्लासेवा आणि कार्यकारी सेवांमध्ये अंतर राखण्यासाठी आम्ही इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायझर डिपार्टमेंट (IAD) ह्या नावाने स्वतंत्र विभाग स्थापन केलेला आहे.

आम्ही तुम्हाला तुमची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मदत करू शकतो. त्यासाठी आम्ही तुम्हाला सर्वमावेशक शुल्काधारित फायनान्शियल प्लॅनिंग पुरवितो आणि बहुतेकांच्या गरजा पूर्ण करू शकतील अशी वित्तीय उत्पादने सुचवतो. अनिश्चिततेवर मात करून तुम्ही तुमच्या पैशावर नियंत्रण मिळवून आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आत्मविश्वासाने पुढे जाण्यास तुम्हाला मदत करणे हे आमचे ध्येय आहे. काम किती गुंतागुंतीचे आहे ह्यावर शुल्क किती असेल ते ठरते.

ध्यानात असू द्या, फायनान्शियल प्लॅनिंग ही छाती दडपून टाकणारी प्रक्रिया असण्याची काही गरज नाही. आमच्याकडे असलेले अर्हताप्राप्त आणि अनुभवी सल्लागार फायनान्शियल प्लॅनिंग ही तुमच्यासाठी एक साधी आणि लाभदायी प्रक्रिया करतील.

**आमची प्रक्रिया :**

१. पहिली भेट आमच्यासाठी आणि तुमच्यासाठी एकमेकांची ओळख होण्याची एक संधी देते. आम्ही तुमच्या सर्व आवश्यकता पूर्ण करण्यास सक्षम आहोत की नाही हे ठरविण्याची एक संधीही तुम्हाला मिळते.

२. तुमची ध्येये आणि उद्दिष्टे तसेच तुमची सध्याची स्थिती स्पष्टपणे समजून घ्या. तुम्हाला तुमच्या संपत्तीने काय साध्य करायचे आहे ह्यावर आपण एक चर्चा करू.

३. चर्चा आणि एक सायकोमेट्रिक चाचणी ह्यांच्या साहाय्याने तुमची जोखीम रूपरेषा निश्चित करा. ह्यामुळे तुम्हाला तुमची ध्येये साध्य करण्यासाठी किती जोखीम घ्यायला हवी आणि किती जोखीम घेणे तुम्ही आवश्यक आहे हे आम्हाला शोधून काढता येईल.

४. तुमची अशी खास वित्तीय योजना म्हणजे फायनान्शियल प्लॅन विकसित करा. ह्यामध्ये तुमच्या गरजेनुरूप शिफारशीनुसार मालमत्ता नियतन आणि गुंतवणूक पर्यायांचा समावेश असेल. हे करताना आम्ही तुमच्या सध्याच्या गुंतवणुकीचेही विश्लेषण करू. आम्ही खास तुमच्या गरजेनुरूप बेतलेल्या फायनान्शियल प्लॅनची अंतिम आवृत्ती सादर करू म्हणजे तुम्ही आगेकूच करण्यास सज्ज असाल.

५. गुंतवणूक प्लॅनची अंमलबजावणी करा. फायनान्शियल प्लॅनमध्ये केलेल्या शिफारशी अंमलात आणण्यासाठी वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्सचीच निवड करण्याचे तुमच्यावर बंधन नाही. मात्र तुमची तशी इच्छा असल्यास तुम्ही आमच्या कार्यकारी विभागाच्या सेवेचा लाभ शिफारशी अंमलात आणण्यासाठी घेऊ शकता.

६. तुमच्या परिस्थितीमधील तसेच बाजारांमधील, अर्थव्यवस्थेमधील आणि करांमधील बदल हाताळण्यासाठी आपण नियमितपणे आणि सक्रियपणे भेटू.

**जर तुम्ही वित्तीय नियोजनाची प्रक्रिया सुरू करण्यास उत्सुक असाल तर तुम्ही आमच्या अंधेरी कार्यालयात इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायझर्सशी संपर्क साधू शकता.**

## वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड

(CIN No.: U74140MH2003PTC142921)

**मुख्य कार्यालय**

**अंधेरी :** ६०२, सहावा मजला, श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स, न्यु लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ४०० ०५३. टेलिफोन : २६७३ २६७१ / २६७३ २६७६.
इ–मेल : information@wiseinvestadvisors.com

**शाखा**

**ठाणे :** ५०२, पाचवा मजला, प्रतीभा बिल्डींग, तीन पेट्रोल पंप जवळ, पाचपाखाडी, ठाणे (पश्चिम) – ४०० ६०२. टेलिफोन : २५३७ १५६७ / २५३९ १३०६.
इ–मेल : information1@wiseinvestadvisors.com

www.wiseinvestadvisors.com

जाहीर निवेदन : प्रकाशनाच्या वेळी यातील सर्व माहिती चुकीची व खोटी नाही याची खात्री केलेली असून, त्याच्या अचूकतेबद्दल व पूर्णत्वाबद्दल आम्ही कोणतेही प्रतिनिधत्व करत नाही. वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायजर्स प्रायव्हेट लिमिटेड ला जबाबदार न धरता सर्व माहिती पुरविण्यात आलेली आहे.

धोके : म्युच्युअल फंड, जसे की सिक्युरिटी इन्व्हेस्टमेन्ट हे शेअर बाजार व इतर धोक्यांवर अवलंबून असतात आणि योजनेची उद्दिष्टे साध्य होतीलच असे खात्रीलायक सांगता येत नाही. सिक्युरिटीजमधील इतर गुंतवणुकीप्रमाणेच युनिटचे एन ए व्हि (NAV) वर किंवा खाली जाऊ शकते व ते कॅपिटल मार्केटवर परिणाम करणाऱ्या घटकांवर व प्रभावांवर अवलंबून असते. कृपया, गुंतवणूक करण्यापूर्वी ऑफर डॉक्युमेन्ट वाचा.

श्री. हेमन्त कुमार रुस्तगी यांनी ६०२, सहावा मजला, श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स, न्यु लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५३ येथून, वाईजइन्व्हेस्ट ॲडव्हायजर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्यासाठी संपादित, प्रकाशित केले आहे व ॲडव्हान्टएज ऑफसेट प्रिंटर्स, के–७ रिजवी पार्क, एस. व्ही. रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई ४०००५४ येथे छापले आहे.

Edited, Published and Printed by Mr. Hemant Kumar Rustagi, on behalf of **Wiseinvest Advisors Pvt. Ltd.** from 602, 6th Floor, Sri Krishna Complex, Opp. Laxmi Ind. Estate, New Link Road, Andheri West, Mumbai 400053 at **AdvantEdge Offset Printers,** K-7 Rizvi Park, S.V. Rd. , Santacruz (W), Mumbai 400 054. Design by **Mosaic Design.** Copyright reserved © 2007. All rights reserved in favour of Wiseinvest Advisors Pvt. Ltd.